महाराष्ट्र टाइम्स नागपूर । रविवार, ११ ऑक्टोबर २०२०

# बेघरांना उपराजधानीत मिळाला निवारा

■ मनपाने केला दावा; जागतिक बेघरदिनी कार्यक्रम

म.टा. विशेष प्रतिनिधी,नागपूर

शहरात उघड्यावर वास्तव्य करणाऱ्या बेघर व निराधारांना मनपातर्फे निवारा उपलब्ध करून दिल्याचा दावा करण्यात आला आहे. दीनदयाल अंत्योदय योजना राष्ट्रीय शहरी उपजिविका अभियानाअंतर्गत ही सुविधा देण्यात आली आहे. आरोग्य व नेत्र तपासणीही करून औषधोपचार करण्यात अले आहेत. शनिवारी जागतिक बेघर दिनानिमित्त हा उपक्रम राबविण्यात आला.

बेघर व निराधारांना जीवन सुसह्य करण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेच्या समाज कल्याण विभागाने शहरात पाच ठिकाणी बेघर निवारे सुरू केले आहेत. त्यामुळे उघड्यावर झोपणाऱ्या बेघर व निराधारांना बेघर निवारा केंद्राचा आधार मिळाला आहे. त्यांना निवारागृहात मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. जागतिक बेघर दिनाच्या पूर्वसंध्येला विविध ठिकाणी बेघर व्यक्तीची शोध मोहीम राबवून त्यांना निवाऱ्यात आणण्यात आले, निवाऱ्याची स्वच्छता, साफसफाई व निर्जंतुकीकरण करून निवारा आकर्षक सजविण्यात आले, बेघरांसाठी निःशुल्क आरोग्य तपासणी, मोतिबिंदू व नेत्र शिबिराचे आयोजन करून त्यात निःशुल्क औषधोपचार करण्यात आले. महाविद्यालयीन विद्यार्थी आणि बेघर संवादअंतर्गत बेघरांचे समुपदेशन करण्यात आले. यावेळी बेघरांना करोना विषाणू प्रादुर्भावाच्या अनुषंगाने मास्कचा वापर, हात स्वच्छ धुणे, सॅनिटायजरचा वापर, सामाजिक अंतर याबाबत जागृतीपर मार्गदर्शन करून त्यांना मास्क व सॅनिटायजर वाटप करण्यात आले.

जागतिक बेघर दिनानिमित्त कार्यक्रमाला मनपा उपायुक्त प्रकाश वराडे, उपजिविका अभियान व्यवस्थापक प्रमोद खोब्रागडे, विनय त्रिकोलवर, बार्टीचे प्रकल्प अधिकारी हृदय गोडबोले, समतादूत राष्ट्रपाल डोंगरे, शारदा माकोडे, दिक्षा पवार यांच्यासह डॉक्टर्स , कर्मचारी उपस्थित होते.



**इंदोरा प्रभागात नगरसेविका स्नेहा निकोसे, विवेक निकोसे यांच्यातर्फे बेघरांना आवश्यक सामग्रीचे वितरण करण्यात आले.**

## इंदोरा प्रभागातही शिबिर

जागतिक बेघर दिनानिमित्त प्रभाग नऊ मनपा इंदोरा बेघर निवारा केंद्र येथे बेघरांना दैनिक उपयोग सामग्री वितरण करण्यात आले. बेघरांची आरोग्य व करोना तपासणी करण्यात आली. करोना जागरूकता पदयात्रा काढण्यात आली. परमात्मा एक सेवक शिक्षण संस्था, मनपा समाजकल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने नगरसेविका स्नेहा विवेक निकोसे, माजी नगरसेवक भास्कर पराते, डॉ. खापर्डे, मनपा समाज कल्याण विभागातर्फे रश्मी, प्रशान्त उके यांच्या सहकाऱ्याने बेघरंना सामग्री प्रदान करण्यात आली.

दैनिक
प्रतिवीर
किंमत ४ ₹
सोलापूर/कोल्हापूर/मुंबई/ठाणे/औरंगाबाद/नांदेड/बुलढाणा/नाशिक/उस्मानाबाद
आर.एन.आय.रजिस्ट्रेशन क्र. MAHMAR/2010/34845

# जागतिक बेघर दिन साजरा

**औरंगाबाद / प्रतिनिधी**

सामाजिकन्यायवविशेषसहाय्यविभागाच्याडॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन प्रशिक्षण संस्था बार्टी व महानगरपालिका औरंगाबाद राष्ट्रीय शहरी उपजीविका अभियान अंतर्गत बोधि बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित संत गाडगे महाराज शहरी बेघर निवारागृह रेल्वे स्टेशन औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने आज जागतिक बेघर दिन कोरोना काळात सामाजिक अंतर व सर्व नियमाचे पालन करून मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाची सुरवात महापुरुषच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यानंतर निवारागृह प्रमुख प्रा.प्रशांत दंदे यांनी कार्यक्रमाची रूपरेषा मांडून प्रस्ताविक केले.यानंतर प्रकल्प अधिकारी योगेश सोनवणे यांनी निवारागृहात सुविधा व कोरोना काळात घ्यावयाची स्वतःची व इतरांची काळीज, बरोबर बार्टी व समाज कल्याण विभागाच्या विविध योजना या विषयी मार्गदर्शन केले.याप्रसंगी बोधि बहुउद्देशीय संस्थेचे प्रा.प्रशांत दंदे,महाराष्ट्र शिक्षण व सांस्कृतिक क्रिडा मंडळाचे प्रशांत गायकवाड,संजय देवतवाड,समतादूत रविकुमार कळसाईतकर,सुभाष राठोड,मोसीन पठाण,सुषमा उके,मीनाक्षी जाधव,पूनम कुमावत,विद्या दाभाडे,स्नेहलता मगरे तसेच बेघर निवारागृहातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अधीक्षक संदीप वाघमारे,सुंदर डोघवाड यांनी विशेष परीश्रम घेतले.



# धुळे महानगर पालिका धुळे अंतर्गत हरि ओम बहुउदेशीय संचालित बेघर निवारा केंद्र येथे बेघर दिवस साजरा





धुळे महानगर पालिका धुळे अंतर्गत हरि ओम बहुउदेशीय संचालित बेघर निवारा केंद्र येथे बेघर दिवस साजरा करण्यात आला. या प्रसंगी १) लाभार्थ्यांना कपडे वाटप करण्यात आले २) जनजागृती संबधीत पोस्टरचे अनावरण करण्यात आले.३) मास्क चे वाटप करण्यात आले.४) बकेचे खाते काढुन बँक पास बुकचे वाटप करण्यात आले.४) आधार कार्ड वाटप करण्यात आले ५) लाभार्थ्यांना रोग प्रतिकार शक्ती वाढविण्यासाठी औषध वाटप करण्यात आले. जागतीक बेघर दिवसा निमित्त निवारा येथे बेघर लाभार्थ्यांच्या हस्ते केक कापण्यात आले. या प्रसंगी मा.आजिज शेख आयुक्त सो, मा.पल्लवी शिरसाठ सो. मा. गणेश गिरी शहर प्रकल्प अधिकारी तथा अतिरीक्त आयुक्तसो. जिल्हा प्रशासन अधिकारी, मा.इजि. . शेख सर ,टाटा कालेज, मा.श्री भानुदास पाटील सर बार्टी, प्रकल्प अधिकारी बार्टी संस्था, श्री नरेश भामरे बार्टी, आरोग्य अधिकारी जाधव सर, शहर व्यवस्थापक गणेश खोडे, गणेशभाऊ चौधरी हरि ओम संस्था अध्यक्ष , काळजी वाहक सागर चौधरी ,काळजीवाहक भाटीया मडम व टिम म.न.पा.धुळे इ.यांच्या उपस्थितीत बेघर दिवस साजरा करण्यात आला.

पोलिस निरीक्षक मधुकर सावंत यांना रविवारी मिळालेल्या माहितीवरून सहायक पोलिस निरीक्षक गौतम वावळे व कर्मचारी यांनी सापळा रचून वाळूज औद्योगिक परिसरातील रांजणगाव (शेणपुंजी) येथील सखाराम तुकाराम जगताप (वय २९ वर्षे, रा. ओमसाईनगर) व प्रताप विष्णू कोरडे (वय २९ वर्षे, रा. माऊलीनगर, कमळापूर रोड) यांना ताब्यात घेऊन विचारपूस केली. त्यावेळी त्यांनी रांजणगावसह (शेणपुंजी) इतर ठिकाणाहून सहा दुचाकी चोरी केल्याचे

**वाळूज : एमआयडीसी पोलिसांनी जप्त केलेल्या दुचाकि आरोपी आणि पोलिस पथक.**

कबूल केले. त्यांनी सांगितल्याप्रमाणे एक शाइन, एक पल्सर, एक हीरो स्प्लेंडर प्रो तसेच बदनापूर पोलिस ठाणे हद्दीतील एक स्प्लेंडर प्लस व पोलिस ठाणे साखरखेर्डा येथील स्प्लेंडर प्रो. असे सहा गुन्हे उघडकीस आले आहेत. पोलिसांनी १ लाख ५५ हजार रुपये किमतीच्या एकूण सह दुचाकी जप्त

केल्या. संशयिताकडून चोरीचे गुन्हे उघडकीस असल्याचे पोलिस नि सावंत यांनी सांगितले पोलिस आयुक्त निखि उपआयुक्त निकेश खाट पोलिस आयुक्त विवेक मार्गदर्शनाखाली करण्या

# जागतिक बेघर दिनानिमित्त बार्टीतर्फे कार्यक्रम

**औरंगाबाद, ता. ११ :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन प्रशिक्षण संस्था बार्टी व महापालिका राष्ट्रीय शहरी उपजीविका अभियान अंतर्गत बोधी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित संत गाडगे महाराज शहरी बेघर निवारागृह यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (ता. दहा) जागतिक बेघर दिन साजरा करण्यात आला.

यावेळी निवारागृह प्रमुख प्रा. प्रशांत दंदे यांनी कार्यक्रमाची रूपरेषा मांडून प्रास्ताविक केले. प्रकल्प अधिकारी योगेश सोनवणे यांनी निवारागृह सुविधा, कोरोनात घ्यावयाची काळीज यासह बार्टी व समाजकल्याण विभागाच्या विविध योजनांविषयी मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्रशांत गायकवाड, संजय देवतवाड, रविकुमार कळसाईतकर, सुभाष राठोड, मोसीन पठाण, सुषमा उके, मीनाक्षी जाधव, पूनम कुमावत, विद्या दाभाडे, स्नेहलता मगरे तसेच बेघर निवारागृहातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमासाठी संदीप वाघमारे, सुंदर डोघवाड यांनी पुढाकार घेतला.

# मुक्त वि

**औरंगाबाद,** त यशवंतराव चव्हाण विद्यापीठाच्या औरंग बीए अंतिम वर्ष मंगळवारी (ता. तेर आहेत, अशी माहि केंद्राचे वरिष्ठ शैक्षणि डॉ. राम माने यांनी दि

बीएच्या परीक्षे विद्यापीठाने ww digitaluniversity संकेतस्थळावर प्रसि रोज दोन सत्रांमध्ये असून, सकाळचे सत्र एक वाजेपर्यंत असेल

# ऐतिहासिक दरवाजांचे संवर्धन

## विद्युत रोषणाईही करणार, आठ दरव

**सकाळ वृत्तसेवा**

रोषणगेट, पैठणगेट, जाफरगेट या गटची दुरुस्ती, सुशोभीकरण होत

निर्णय घेण्यात आ इंटेक या कंपनीला प्र

# सावली केंद्र हा पथदर्शी उपक्रम - महापौर ढोरे

## जागतिक बेघर दिनी सावली निवारा केंद्राचे उद्‌घाटन

**पिंपरी, दि. १० (प्रतिनिधी)** - पिंपरी चिंचवड महापालिकेने बेघरांसाठी निवारा केंद्र सुरू करुन त्यांना आधार देण्याचे काम सुरु केले आहे. या माध्यमातून बेघरांना प्रशिक्षण देऊन स्वत:च्या पायावर उभे करण्यात येणार आहे, त्यामुळे हा पथदर्शी उपक्रम असून इतरांसाठी आदर्श ठरणारा आहे, असे मत महापौर माई ढोरे यांनी व्यक्त केले.

जागतिक बेघर दिनाचे औचित्य साधून पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत पिंपरी भाजी मंडई येथे शहरातील बेघरांसाठी निवारा केंद्र सुरु करण्यात आले आहे. या केंद्राचे उद्‌घाटन महापौर माई ढोरे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी उपमहापौर तुषार हिंगे, सत्तारुढ पक्षनेते नामदेव ढाके, अतिरिक्त आयुक्त संतोष पाटील, उपआयुक्त अजय चारठणकर, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, समाज विकास अधिकारी संभाजी ऐवले, सहायक समाज विकास अधिकारी सुहास बहादरपुरे, माहिती व जनसंपर्कचे प्रफुल्ल पुराणिक, बार्टी संस्थेच्या संगिता शहाडे, रियल लाईफ रियल पिपल संस्थेचे एम.एम.हुसेन, सी.वाय.डी.ए. संस्थेचे मॉथ्यू, एन.यु.एल.एम.चे तांत्रिक तज्ञ संजीव धुळम आदी उपस्थित होते.

महापौर माई ढोरे म्हणाल्या महापालिकेने सुरु केलेला निवारा केंद्राचा उपक्रम इतरांपेक्षा वेगळा आहे, याठिकाणी बेघरांसाठी सर्व सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. त्यांच्या साठी स्वत:चा तात्पुरत्या स्वरुपात निवारा असावा यासाठी हा उपक्रम महत्वपुर्ण ठरणार आहे. बेघरांबाबत नागरिकांमध्ये आस्था निर्माण झाली पाहीजे. तसेच ते देखिल देशाचे नागरीक आहेत. त्यांना आधार व सहानभुतीची गरज असून समाजाने सहकार्य केल्यास ते आपल्या आयुष्यात नव्याने उभारी घेऊ शकतील.

सत्तारुढ पक्षनेते नामदेव ढाके यांनी आपल्या भाषणात उपेक्षितांना जीवन जगता आले पाहिजे, तरच त्याला विकास म्हणता येईल. यासाठी पालिकेने सुरु केलेले निवारा केंद्र अशा गरजूंसाठी त्यांचे जीवनमान उंचावणारा आदर्श उपक्रम ठरणार आहे, असे सांगून त्यांनी बेघरांमध्ये सकारात्मक भावना निर्माण झाल्यास बेघर देखील आपल्या पायावर उभे राहून नव्या उमेदीने जगण्याचा मार्ग निर्माण करतील असेही ते म्हणाले.

> सावली केंद्राच्या माध्यमातून बेवारस रुग्ण व ज्यांना निवारा नाही त्यांची सेवा करायची आहे. ही संधी रियल लाइफ रियल पीपल या संस्थेला मिळाली आहे. या संधीचे आम्ही नक्कीच सोने करू.
>
> **- एम.ए.हुसेन,** प्रमुख रियल लाइफ रियल पीपल

महाराष्ट्र

रविवार दि. ११ आक्टोबर २०

# बार्टीच्या सयुक्त विधमाने मालेगाव महापालिका येथे जागतिक बेघर दिवस उत्साहात साजरा





मालेगाव (प्रतिनिधी) : मालेगाव महानगरपालिकेच्या केंद्र शासन पुरस्कृत दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत जिव्हाळा बेघर निवारा पंचशील गोठ्ठाळ, मोसम पूल येथे कार्यरत आहे. सदर निवारा देखभाल व व्यवस्थापन यांचे काम हे राईट वे सामाजिक संस्था यांच्या मार्फत केले जाते. १० ऑक्टोबर हा सर्व जगात जागतिक बेघर दिवस म्हणून साजरा केला जातो, मा.शासन यांच्या कडून सदरचा दिवस निमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्याचे नियोजन देण्यात आले होत त्या नुसार जिव्हाळा बेघर निवारा येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात ऑनलाईन गुगल मिट द्वारे परिसंवाद आयोजित करण्यात आला होता त्यात सर्वोच्च न्यायालय नियुक्त राज्यस्तरीय नियंत्रण समिती सदस्य मा.श्रीमती प्रमिला जरग , ब्रिजेश आर्या, नगरपालिका प्रशासन संचालनालय येथील राज्य अभियान व्यवस्थापक मा.रवींद्र जाधव, उपायुक्त ( विकास) नितीन कापडणीस, शहर अभियान व्यवस्थापक रोहित कन्नोर तसेच निवारा मध्ये राहणारे लाभार्थी यांनी सहभाग घेतला . श्री. ब्रिजेश आर्या यांनी सांगितले की, बेघर हा वंचित घटक असून समाजात त्यांना आपुलकीचे व माणुसकीचे स्थान देणे गरजेचे आहे तसेच त्यांच्या विकासासाठी मा.शासन स्तराकर विविध प्रकारच्या योजना तयार करण्याचे काम सुरु आहे. त्यांना हक्काचे घर उपलब्ध व्हावे या साठी प्रधानमंत्री आवास योजनेत घरकुल देणे या साठी राज्य स्तरीय समिती प्रयत्नशील आहे.

नगरपालिका प्रशासन संचालनालय येथील राज्य अभियान व्यवस्थापक मा.रवींद्र जाधव यांनी सांगितले की, महाराष्ट्र मध्ये मालेगाव महानगरपालिका ही बेघर लोकांसाठी निवारा सुरु करणारी पहिली महानगरपालिका पालिका असून देखभाल व व्यवस्थापन तसेच बेघर लोकांचे पुनर्वस करणे कामी पर्यंत केले जातात. परिसंवाद नंतर स्थानिक स्तरावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते सदरच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष शहर अभियान व्यवस्थापक रोहित कन्नोर, प्रमुख पाहुणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था समतादूत शुद्धोदन तायडे, न्याय व विधी विभागाचे गणेश बच्छाव हे होते, समतादूत शुद्धोदन तायडे यांनी बार्टी मार्फत असलेल्या विविध योजना बाबत माहिती देऊन बेघरसाठी यांचे पुनर्वसन कसे करता येईल या साठीचे ये विविध उपायोजना सांगितल्या, शहर अभियान व्यवस्थापक रोहित कन्नोर यांनी कोविड काळात निवारा यांनी केलेल्या कार्याबद्दल माहिती देऊन सदरचा आहवाल प्रसिद्ध करण्यात आला. कार्यक्रमात लाभार्थी यानां ओळखपत्र वाटप, बँक पासबुक चे वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी होणे कामी मनीष सूर्यवंशी, ओबेद शेख, बेबीनंदा मुळे , कल्पना सोनवसारे, हिरकणी वाघळे, संदीप बाघ, इशरत जहा, शाहीन शेख, मीना बोरसे ,भैय्या धनगर, फरान काजी सायिम सर्व सहयोगींनी यांनी परिश्रम घेतले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चेतन खाडिकर तर आभार प्रदर्शन मनोज कुवलेले यांनी केले .



मालेगाव : जागतिक बेघर दिन कार्यक्रमात सहभागी झालेले लाभार्थी.

# मालेगाव महापालिकेत जागतिक बेघर दिवस

सकाळ वृत्तसेवा

मालेगाव, ता. ११ : येथील महापालिकेतर्फे जागतिक बेघर दिवस झाला. केंद्रशासन पुरस्कृत पं. दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानांतर्गत 'जिव्हाळा' बेघर निवारा येथील कार्यरत आहे. हा निवारा देखभाल व व्यवस्थापन यांचे काम 'राईट वे' सामाजिक संस्थेतर्फे केले जाते.

कार्यक्रमात गुगल मीटद्वारे परिसंवाद झाला. राज्यस्तरीय नियंत्रण समिती सदस्य प्रमिला जरग, ब्रिजेश आर्या, पालिका प्रशासन संचालनालयाचे अभियान व्यवस्थापक रवींद्र जाधव यांनी मार्गदर्शन केले. उपायुक्त नितीन कापडणीस, शहर अभियान व्यवस्थापक रोहित कन्नोर तसेच निवारामध्ये राहणारे लाभार्थी यांनी सहभाग घेतला.

श्री. आर्या म्हणाले, की बेघर हा वंचित घटक असून, समाजात त्यांना आपुलकीचे व माणुसकीचे स्थान देणे गरजेचे आहे. त्यांच्या विकासासाठी शासन स्तरावर विविध प्रकराच्या योजना तयार करण्याचे काम सध्या सुरू आहे. त्यांना हक्काचे घर उपलब्ध व्हावे, यासाठी प्रधानमंत्री आवास योजनेत घरकुल मिळण्यासाठी राज्यस्तरीय समिती प्रयत्नशील आहे.

श्री. जाधव म्हणाले, की मालेगाव महापालिका ही बेघर लोकांसाठी निवारा सुरू करणारी राज्यातील पहिली महापालिका आहे. शहर अभियान व्यवस्थापक रोहित कन्नोर यांनी मार्गदर्शन केले. समतादूत शुद्धोदन तायडे, न्याय व विधी विभागाचे गणेश बच्छाव उपस्थित होते. श्री. तायडे यांनी 'बार्टी' मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देऊन बेघरांचे पुनर्वसन कसे करता येईल, यासंदर्भातील उपायोजना सांगितल्या. कार्यक्रमात लाभार्थ्यांना ओळखपत्र व बँक पासबुकचे वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वितेसाठी मनीष सूर्यवंशी, ओबेद शेख, बेबीनंदा मुळे, कल्पना सोनपसारे, हिरकणी वाबळे, संदीप वाघ, इशारत जहा, शाहीन शेख, मीना बोरसे, भय्या धनगर, फरान काजी आदींनी प्रयत्न केले. चेतन खांडेकर यांनी सूत्रसंचालन केले. मनोज कुकलेले यांनी आभार मानले.

# विश्व बेघर दिवस : रैनबसेरा में स्वास्थ्य व नेत्र जांच

**भास्कर संवाददाता|** नागपुर. खुद बेसहारा है, लेकिन परिवार का सहारा बने हुए हैं। घर से दूर रहकर भी दिनभर की कमाई से अपना खर्च निभाकर परिवार के लोगों को मदद करते हैं। ये उन लोगों की दास्तां हैं, जो रैनबसेरे में रहकर रोजी-रोटी कमाते हैं। शहर में मनपा के पांच रैनबसेरे हैं। यहां उनके रहने का इंतजाम है। दिनभर रोजी-रोटी कमाते हैं और रात के समय रैनबसेरे में आराम फरमाते हैं।

काम की तलाश में गांव छोड़कर शहर आए और यहीं के हो गए। शहर में रहने के लिए घर नहीं, लेकिन रोजगार के अवसर है। चार पैसा कमाने की उम्मीद लेकर शहर पहुंचे बेघर लोगों के लिए मनपा ने रैनबसेरा बनाया है। यहां रहने के ऐवज में उनसे एक पैसा भी नहीं लिया जाता। सोने के लिए बिस्तर, मनोरंजन के लिए टीवी, स्वास्थ्य के देखभाल की सुविधा, नहाने-धोने की व्यवस्था मनपा की ओर से उपलब्ध कराई गई है। विश्व बेघर दिवस पर इनकी स्वास्थ्य व नेत्र जांच की गई। औषधोपचार भी किया गया। गरीबी के चलते जहां परिवार पालने के लिए जेब में पैसा नहीं, वहीं रैनबसेरा में स्वास्थ्य की देखभाल करने पर उनकी आंखों में खुशी के आंसू झलक पड़े। मनपा उपायुक्त प्रकश वराडे के मार्गदर्शन में आयोजित स्वास्थ्य जांच शिविर के सफलतार्थ उपजीविका अभियान प्रबंधक प्रमोद खोब्रागड़े, विनय त्रिकोटवा, बार्टी के प्रकल्प अधिकारी हृदय गोड़बाले, राष्ट्रपाल डोंगरे, शारदा माकोड़े, दीक्षा पवार, डॉक्टर्स व कर्मचारियों से प्रयास किया।

जोशी तर महिला शहराध्यक्षपदी निवड ...

तालुकाध्यक्ष कृष्णा सोळंके, शहराध्यक्ष श्रीनिवास मोटे, रवि जोशी, बाळासाहेब गव्हाणकर, रामेश्वर अवचारे, ॲड. आदिनाथ मुंडे, विशाल मुंडे, श्रीपाद कोद्रीकर, देवानंद जोशी, रमेश पेकम, सदानंद पेकम आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

## कै. विलास गोपले पुण्यतिथीचे आयोजन

परभणी, (प्रतिनिधी)- विलास गोपले विद्यार्थी सेना, भारतीय टायगर सेना यांच्यावतीने साखला प्लॉट येथील बाबासाहेब गोपले कार्यालयात विलास गोपले यांची पुण्यतिथी १२ ऑक्टोबर रोजी साजरी करण्यात येणार आहे. यावेळी जेष्ठ नेते एम.एल.गवारे, हरिभाऊ शिंदे, भिकाजी चव्हाण, दासराव चव्हाण, चंद्रकांत गाडे, नरहरी साळवे, नारायण लोंढे, रत्नमाला कदम, सुनिता काळे, कोमार आदींची उपस्थिती राहणार आहे.

## जागतिक बेघर दिन साजरा

परभणी, (प्रतिनिधी)- अनार्य रूरल डेव्हलपमेंट अकादमी संचलित बेघर निवारा केंद्र येथे जागतिक बेघर दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बेघर निवारा केंद्राचे सहाय्यक व्यवस्थापक एस.एस.मस्के तर प्रमुख पाहुणे म्हणून बार्टीचे प्रकल्प अधिकारी दि.फ.लोंढे,राज्य व्यवस्थापक अमोल देशपांडे, नगरसेवक विजय ठाकूर, शेख महेबूब यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक वाय.आर.पठाण यांनी केले. सुत्रसंचलन विद्या रसाळ यांनी तर आभार विनायक करंडे यांनी मानले. यावेळी निवारा केंद्राच्या अध्यक्षा सुकेशिनी चौधरी, संदीप बेंडसुरे, नयनरत्न घुगे आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी बार्टीचे एम.टी.तुरे, निलेश लाड, ज्योती लोखंडे, कमल पवार आदींनी परिश्रम घेतले.

## विनोदअण्णा भोसले,गरड यांचा सत्कार

परभणी, (प्रतिनिधी)- नानाभाऊ पटोले युवा मंचच्यावतीने मोटारसायकलवर नानाभाऊ पटोले युवा मंच महाराष्ट्र नाव टाकण्याचे उद्घाटन नुकतेच करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य मराठा विकास महामंडळाचे संचालकपदी व्याख्याते विनोदअण्णा भोसले यांची तर अण्णासाहेब पाटील आर्थिक मराठा विकास महामंडळ महाराष्ट्रचे माहितीदूत पदी अतिश गरड यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उद्धव भिसे, शिवा यादव, नवनाथ देशमुख, माऊली धस, हिंगे, नितीन रन्हेर यांची उपस्थिती होती. सुत्रसंचलन नितीन जाधव यांनी केले.

## राहुल जंगले यांचे निधन

गंगाखेड, (वार्ताहर)- शहरातील युवा उद्योजक म्हणून ओळख असलेले राहुल विलासराव जंगले (वय-३७ वर्ष) यांचे औरंगाबाद

जळगाव तरुण भारत
Main Edition | 2020-10-11 | Page- 3





# शहरी बेघर निवारा केंद्रात विविध कार्यक्रम

## जागतिक बेघर दिनानिमित्त लाभार्थ्यांची नेत्र, रक्त तपासणी

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १० ऑक्टोबर**

जागतिक बेघर निवारा दिनानिमित्त १० ऑक्टोबर रोजी नवीन बसस्थानकाजवळील महापालिका आणि केशवस्मृती प्रतिष्ठान संचालित शहरी बेघर निवारा केंद्रात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यावेळी सुमारे ३५ लाभार्थ्यांची रक्तगट आणि नेत्र तपासणी करण्यात आली. त्यानंतर मान्यवरांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

केंद्राचे प्रकल्प प्रमुख दिलीप चोपडा यांच्या हस्ते सकाळी १० वाजता नेत्र तपासणीस सुरुवात झाली. यावेळी ३५ लाभार्थ्यांना तज्ज्ञ व्यक्तीद्वारे अत्याधुनिक मशिनरीच्या सहाय्याने नेत्र तपासणी केली. रक्तगट तपासणी गोळवलकर रक्तपेढीचे चंद्रकांत जोशी आणि सहकाऱ्यांनी करुन रक्तगट कार्ड दिले. त्यानंतर ११ वाजता 'बार्टी'चे अधिकारी भाग्यश्री पैकराव आणि सहकाऱ्यांनी शासकीय योजनांची माहिती दिली. तसेच कोरोना विषाणूला न घाबरता मानसिक स्वास्थ्य टिकवून काळजी घेण्याबाबत मार्गदर्शन केले.

महापालिकेच्या राष्ट्रीय नागरी उपयोजिका अभियानाच्या व्यवस्थापिका गायत्री पाटील यांनीही यावेळी मार्गदर्शन केले. त्यानंतर लाभार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. शेवटी गायत्री पाटील यांच्या सासूबाई कल्पनाताई यांच्या वाढदिवसानिमित्त जिलेबीचे वाटप करण्यात आले.

यशस्वीतेसाठी बेघर निवारा केंद्राचे प्रकल्प प्रमुख दिलीप चोपडा, दुर्गेश वाणी, मनिषा पारधी, राजेंद्र मराठे, प्रदीप पाटील, किरण मोरे व सुनिल भामरे यांनी परिश्रम घेतले.

Powered by Bharati Web Pvt Ltd

सामाजिक

# जागतिक बेघर दिवस

October 10, 2020 MarketMediaNews 0 Comments




अकोला:अकोटफैल येथील आशा बेघर निवारा महानगर पालिका अकोला ये़थे शनिवारी जागतिक बेघर दिवस खऱ्या अर्थाने साजरा झाला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टीट्युट पुणे येथुन विजय पी.बेदरकर जिल्हा प्रकल्प अधिकारी यांनी सहभाग नोंदविला. निराधार लोकांशी हितगुज करत कोरोनावर जनजाग्रुतीपर मार्गदर्शन केले. संविधान उद्देशिका व बार्टी प्रकाशाच्या पुस्तकांचे वाटप करण्यात आले. कोरोनामध्ये घ्यावयाची काळजी सामाजिक अंतर व मास्कचा वापर यावर सामाजिक कार्यकर्ते मनिष हिवराळे यांनी माहिती दिली.सदर कार्यक्रम शहर अभियान व्यवस्थापक श्रीयुत संजय राजनकर यांच्या मार्गदर्शनात पार पाडला. कार्यक्रमच्या यशस्वितेसाठी निवारा येथिल काळजीवाहक अक्षय बुंदेले,महिला काळजीवाहक उषा राऊत,सुरक्षा रक्षक सोनु ठाकुर,शुभम ठाकुर व्यवस्थापक शंतनु भड यांनी परीश्रम

# बार्टीतर्फे जागतिक बेघर दिन

**नाशिक :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), समतादूत प्रकल्प आणि केंद्र सरकार पुरस्कृत पंडित दीनदयाळ उपाध्याय अंत्योदय योजना राष्ट्रीय उपजीविका अभियानांतर्गत नाशिक महापालिकेतर्फे बेघर निवारा केंद्र, नाशिक यांच्याकडून गोदाघाट येथील संत गाडगेबाबा बेघर निवारा केंद्र येथे जागतिक बेघर दिन साजरा करण्यात आला. या वेळी रंजना शिंदे यांनी शहर अभियान व्यवस्थापक सामाजिक विकास व पायाभूत सुविधा यांनी शासनाच्या योजनांची माहिती देत शहरातील साधुग्राम आणि तपोवन परिसरात सुरू होत असलेल्या निवारा केंद्राबाबत माहिती दिली. समतादूत प्रकल्प अधिकारी प्रतिज्ञा दाभाडे यांनी उपस्थित बेघर नागरिकांना स्वच्छता आणि शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगत समाजकल्याण विभाग यांच्या निवासी शाळांची माहिती दिली. या वेळी पल्लवी वक्ते, शहर अभियान व्यवस्थापक कौशल्य प्रशिक्षण, संतोष निकम शहर अभियान व्यवस्थापक संदीप भोसले, समूह संघटक सीमा भुडे, कल्पना सोनार, संगीता इंगळे, सुनीता कुमावत, पल्लवी श्रीमाळी, आशा गोसावी, समतादूत बी. सी. चव्हाण यांच्यासह सर्व शहर संघटक आणि बेघर नागरिक उपस्थित होते.

# वंचितांच्या सेवेमुळेच ३५ वर्षे नगराध्यक्ष - डॉ. भारतभूषण क्षीरसागर

## निवारागृहातील निराधारांची भेट घेऊन दिल्या शुभेच्छा; वंचित महिलांना साड्यांचे वाटप

● बाळकडू : व्यंकटेश जोशी
**मोबा. ८६००४९७६५०**

**अंबाजोगाई (बीड) :** राजकारण आणि समाजकारण करताना तळागाळातील माणसाला प्राधान्याने न्याय द्यायचा हे काकूंनी आम्हाला शिकवले. त्यांच्या विचारांना प्रमाण मानून गोरगरिबांसाठीची शासनाची प्रत्येक योजना खेचून आणली. राज्यातील पहिले बेघर निवारागृह बीडमध्ये उभे केले. धरणी हेच अंथरून आणि आभाळ हेच पांघरून असलेल्या बेघरांना हक्काचा निवारा मिळाला. बेघर, निराधार, वंचीत, उपेक्षीतांची सेवा आणि सेवेतून मिळालेल्या आशिर्वादामुळेच तब्बल ३५ वर्षांपासून नगराध्यक्ष म्हणून बीडकरांची सेवा करत असल्याचे भावनिक उद्गार नगराध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांनी काढले.

जागतिक बेघर दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. जागतिक स्तरावर १० ऑक्टोबर हा दिवस बेघर दिन म्हणून साजरा केला जातो. सन- २०१४ मध्ये बीड येथे माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली नगराध्यक्ष डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांनी महाराष्ट्रातील पहिले भव्य असे बेघर निवारागृह उभे केले. या निवारागृहात सध्या जवळपास ६० बेघर, निराधार लोक वास्तव्यास आहेत.

शनिवारी नवी भाजी मंडई परिसरातील जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात जागतिक बेघरदिनाचे औचित्य साधून येथील निराधार महिलांना साड्यांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून नगराध्यक्ष डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमात पुढे बोलताना डॉ. क्षीरसागर म्हणाले की, दिल्ली येथे रक्त गोठवणार्‍या कडाक्याच्या थंडीत शेकडो लोक रस्त्यावर झोपलेले एका जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्याने पाहिले. पशु, पक्षी अशा प्रत्येक जीवासाठी कायदा आहे. मग बेघर असलेल्या निराधारांसाठी कायदा का नाही ? असे म्हणत त्या सामाजिक कार्यकर्त्याने न्यायालयात जनहित याचीका दाखल केली. यावर तात्काळ सुनावणी घेत प्रत्येक राज्याला बेघरांसाठी निवारागृह उभे करण्याच्या सुचना न्यायालयाने दिल्या. माजी मंत्री जयदत्त अण्णा यांच्या मार्गदर्शनाखाली बीड येथे राज्यातील पहिले निवारागृह मंजूर करून घेतले. अधिकार्‍यांनी निवारागृहासाठी खंडेश्वरी परिसर व शहरातील ईतर ठिकाणच्या अनेक जागा सुचवल्या मात्र मी शहराच्या मध्यवर्ती, सरकारी दवाखाना, बसस्टँड




येथून हाकेच्या अंतरावर असलेल्या मोक्याच्या जागेवर निवारागृह बांधण्याचा निर्णय घेतला अन सहा महिन्याच्या मराठवाड्यात कुठेही नाही अशी भव्य आणि प्रशस्त जागेवर निवारागृहाची ईमारत उभी केली.

बीडमध्ये सांस्कृतीक चळवळ गतिमान करण्यासाठी भव्य असे यशवंतराव चव्हाण नाट्यगृह उभे केले, सिध्दीविनायक कॉम्पलेक्सच्या रूपाने व्यापारी संकुल उभे केले, वातानुकूलीत भाजीमंडई बांधली, पाणी प्रश्न कायमचा सोडवण्यासाठी माजलगाव बॅक वॉटर आणि आता भविष्यात वाढता शहर आणी लोकसंख्येचा विस्तार डोळ्यासमोर ठेवून समांतर पाईपलाईन केली, कोट्यावधीचे दर्जेदार सिमेंट रस्ते बांधले, अमृत- अटल योजना आणली, ओपन जीम, शहराच्या वैभवात भर घालणारे क्रिडांगण उभे केले. प्रत्येक प्रभागात छोटे छोटे गार्डन उभारले अशी सर्वांगिन विकासाची कामे केलीच मात्र हे करत असताना तळागाळातील आणि वंचीत, उपेक्षीत, निराधार, बेघर अशा घटकांसाठी प्राधान्याने पंतप्रधान घरकुल, कामगार भवन, बेघर निवारागृह अशी अनेक कामे केली. गोरगरिब, निराधार, बेघर, वंचीत लोकांची सातत्याने सेवा केली. या सेवेतून मिळालेल्या अशिर्वादाच्या बळावरच गेल्या ३५ वर्षांपासून बीडचा नगराध्यक्ष म्हणून जनतेची सेवा करत असल्याचे भावनिक उद्गार त्यांनी काढले. बेघर महिलांसाठी लवकरच स्वतंत्र निवारागृह उभारणार असल्याचे ते शेवटी म्हणाले. यावेळी निवारागृहाचे व्यवस्थापक राजू वंजारे यावेळी प्रास्ताविक करतांना म्हणाले की बेघर, अनाथाची सेवा करतांना मनाला खरे समाधान मिळते, येथे येणारा वापस जातांना धन नेणार नाही तर पैशात न मोजता येणारा आनंद नक्कीच घेवून जाईल हा विश्वास आहे. निवारा केंद्रात निवाराच मिळत नाही तर गरजुंना हक्काचा रोजगार आणी त्यातून चार पैसे मिळण्यासाठी सदैव प्रयत्न केला जातो. जागतीक बेघर दिनानिमित्त येथे विविध सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. बेघर अनाथ हे पण माणसेच आहेत हे प्रत्येकाने लक्षात ठेवून त्यांचाही सन्मान करा. आज पर्यंत ३७ लोकांवर बेघरांना घरातून हाकलून दिल्यामुळे कारवाही झाली असून अनेकांना समजावून सांग्यात आले आहे.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते संतोष सोहनी यांनी अन्नदानासाठी योगदान दिले तर बार्टीचे प्रकल्प अधिकारी एस.पी. कोठुळे, समतादूत श्रीमान म्हात्रे, दिव्यांग राज्य कर्मचारी संघटनेचे उपाध्यक्ष अशोक आठवले, सामाजिक कार्यकर्ते अशोक ढोले, सामाजिक कार्यकर्त्या सुनिता डोंगरे, रूक्मीणी नागापुरे, ॲनी जोसेफ यांच्यासह बेघर महिला, पुरूष मोठ्या उपस्थित होते. या कार्यक्रमात निराधार महिलांना साड्यांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात सुत्रसंचालन शालीनी परदेशी यांनी तर अभिजीत वैद्य यांनी उपस्थितांचे आभार मानले.

पुढारी

# महापालिकेच्या वतीने निवारा केंद्र

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने दिनदयाळ अंत्योदय योजना अंतर्गत पिंपरी भाजी मंडई येथे शहरातील बेघरांसाठी निवारा केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्राचे उद्‌घाटन महापौर माई ढोरे यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी उपमहापौर तुषार हिंगे, सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके,अतिरिक्त आयुक्त संतोष पाटील, उपआयुक्त अजय चारठणकर, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, समाज विकास अधिकारी संभाजी ऐवले, सहा. समाज विकास अधिकारी सुहास बहादरपुरे, माहिती व जनसंपर्कचे प्रफुल्ल पुराणिक, बार्टी संस्थेच्या संगिता शहाडे, एम.एम.हुसेन, सी.वाय.डी.ए.संस्थेचे मॅथ्यू, संजीव धुळम आदी उपस्थित होते.



**पिंपरीतील निवारा केंद्राचे उद्‌घाटन करताना महापौर ढोरे, पक्षनेते ढाके आदी.**

Pimpri Edition
Oct 11, 2020 Page No. 6
newspaper.pudhari.co.in